या मध्यस्थीने फसवणूक झालेले

# फेसबुकवरून भावी नवरदेवाची फसवणूक; ऑनलाईन पद्धतीने पैसे लुबाडले

गोदातीर 08/07/2023

## सायबर सेलमुळे ३५ हजार मिळाले परत

**नांदेड-** शहरातील वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीत फेसबुकवरून वधू- वर परिचय करून देण्याची जाहिरात आली आणि या जाहिरातीद्वारे एकाची ऑनलाईन पस्तीस हजार पाचशे रुपये फसवणूक झाली होती. परंतु सदरची रक्कम सायबर पोलीस ठाण्याच्या मदतीने परत तक्रारदाराला मिळाली.

आशिष प्रकाश सोनेकर यांना त्यांच्या फेसबुकवर वधू-वर परिचय करून देण्याची जाहिरात आली. जाहिरातीमध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवर तक्रारदार यांनी संपर्क केला. आम्ही ऑनलाईन पद्धतीने वधू-वर परिचय करून देतो असे सांगून तक्रारदार यांना काही मुलीचे फोटो पाठवून त्या मुलीचे व त्यांच्या नातेवाईकांची भेट करून देण्यासाठी वेळोवेळी ३५ हजार पाचशे रुपये ऑनलाईन पद्धतीने घेतले. परंतु त्यांना मुलीचे व त्यांच्या नातेवाईकांची भेट करून दिली नाही व भेट करून देण्यात टाळाटाळ करत असल्याने तक्रारदार यांना लक्षात आले की आपल्याला कोणीतरी फसवत आहे. त्यामुळे त्यांनी पोलीस ठाणे वजिराबाद व सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारीवरून सायबर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी सोनेकर यांच्याकडून माहिती घेतली व तात्काळ संबंधित बँक आणि वॅलेट यांचे नोडल अधिकारी यांना ई-मेलद्वारे संपर्क साधला. त्यावरून संबंधित बँका आणि वॅलेट यांनी तात्काळ कारवाई केली. त्या कारवाईच्या अनुषंगाने संबंधित बँकांसोबत आणि वॅलेटसोबत वेळोवेळी पाठपुरावा करून तक्रारदार यांना फसवणूक झालेली पूर्ण रक्कम ३५ हजार पाचशे रुपये त्यांच्या खात्यात परत मिळाली. त्यामुळे तक्रारदार सोनेकर यांनी पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांचे आभार मानले. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक दळवी, सोपान थोरवे, पोलीस नाईक विलास राठोड यांनी पार पाडली.

